| | |
|---|---|
| CNR No. MHSO07-000689-2025 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०७/२०२५**<br>(चंद्रशेखर लक्ष्मण जोशी वि. कोणी नाही) |

## <u>निशाणी क्र. ०१ कडील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन VIII ॲक्ट १८२७ चे कलम २ व ४ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल करण्यात आला.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार यांचे भाऊ जयंत लक्ष्मण जोशी हे दिनांक २०/०२/२०२२ रोजी पंढरपूर येथे मयत झाले. सदर मयत जयंत यांना जयप्रकाश व अशोक असे अन्य दोघे बंधू होते मात्र त्यांचा जयंत यांचे पूर्वीच अनुक्रमे दि.२५/०९/१९९९ रोजी व दि.२२/०४/२०२१ रोजी निधन झालेले आहे. त्यामुळे त्यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारस असून त्यांचेशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. मयत जयंत लक्ष्मण जोशी यांचे नांवे पंढरपूर ता.पंढरपूर जि.सोलापूर येथे प्लॉट जागा स.नं. १४५/२१ तसेच सि.स.नं.१८८४/१ व सि.स.नं.१८८४/अ घरजागा असून त्यांचे पश्चात नियमाप्रमाणे अर्जदारास मिळणे न्यायाच्या दृष्टीने जरुर तो वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

३. प्रस्तुत अर्जाच्या पुष्टयर्थ अर्जदार यांनी नि.क्र.४ कडील कागदपत्रांच्या यादीसह मयत जयंत लक्ष्मण जोशी, अशोक लक्ष्मण जोशी तसेच जयप्रकाश लक्ष्मण जोशी यांचे मृत्यूप्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, पंढरपूर येथील नगर भूमापन क्र.१८८४/१, १८८४/अ चे मालमत्ता पत्रक तसेच पंढरपूर येथील नगर भूमापन क्र.१४५/२१ चा उतारा इ. कागदपत्रे दाखल केली आहेत. याशिवाय दिनांक ०४/०२/२०२६ रोजीचे निशाणी क्र.०८ कडील दैनिक 'सकाळ' या वृत्तपत्रातील जाहीर प्रगटनाची प्रत सुध्दा सादर करण्यात आली आहे. तसेच नि.क्र. ०७ कडे जाहीरनामा सादर करण्यात आला. अर्जदार यांनी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. ९ कडे दाखल केलेले आहे. तसेच नि.क्र. १० कडे अर्जदारातर्फे आणखी जादा तोंडी पुरावा देणेचा नाही अशी पुरसीस दाखल केलेली आहे.

४. उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार यांचे भाऊ जयंत लक्ष्मण जोशी हे दिनांक २०/०२/२०२२ रोजी पंढरपूर येथे मयत झाले. सदर मयत जयंत याचे जयप्रकाश व अशोक असे दोन्ही बंधूचे जयंत यांचे पूर्वीच अनुक्रमे

दि.२५/०९/१९९९ रोजी व दि.२२/०४/२०२१ रोजी निधन झालेले आहे. त्यामुळे अर्जदार हेच मयत जयंत लक्ष्मण जोशी यांचे कायदेशीर वारस आहेत. याशिवाय दिनांक ०४/०२/२०२६ रोजी दैनिक 'सकाळ' या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन प्रसिध्द होऊन व जाहिरनामा प्रसिध्द करुन सुध्दा उपलब्ध कालावधीमध्ये कोणीही आक्षेप नोंदवला नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत जयंत लक्ष्मण जोशी यांचे कायदेशीर वारस आहेत असे प्रमाणपत्र अर्जदार यांचेकडून योग्य ती कोर्ट फी भरुन घेऊन देण्यात यावे.

३. सदर प्रमाणपत्र स्वतः कोणत्याही मालमत्तेत कोणतेही हक्क किंवा शीर्षक निर्माण करीत नाही.

(न्यायासनावर निवेदीत आणि अधीघोषीत)

ANIL SAHEBRAO SONWALKAR

Digitally signed by ANIL SAHEBRAO SONWALKAR
Date: 2026.04.18 17:45:25 +0530

( ए. एस. सोनवलकर )

दिनांकः-१८/०४/२०२६.

४थे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर,
पंढरपूर.

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.A.Lagale, Stenographer |
| Court | :- | 4th Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Pandharpur |
| Date | :- | 18.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 18.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | :- | 18.04.2026 |